

B
Accredited by NAAC
(2009)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ४६ वा वार्षिक
## दीक्षान्त समारंभ

सोमवार, दि. १५ मार्च, २०१०

# मा. प्रा. (डॉ.) ना. ज. पवार

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

यांनी सादर केलेला अहवाल





# मा. प्रा. (डॉ.) एन्. जे. पवार

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



# ४६ वा दीक्षान्त समारंभ

**प्रा. (डॉ.) ना. ज. पवार**

कुलगुरू,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यांनी सादर केलेला अहवाल

आजच्या पदवी प्रदान समारंभाचे प्रमुख पाहुणे व केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा, विद्या परिषदेचे व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी, उपस्थित मान्यवर, माध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो,

आरंभीच ४६ व्या दीक्षान्त समारंभात पदवी व पदविका प्राप्त केलेल्या सर्व स्नातकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देतो. आता मी गेल्या वर्षातील महत्त्वपूर्ण घडामोडींचा अहवाल सादर करीत आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, गेल्या काही वर्षात जागतिकीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाताना आपले विद्यार्थी कुठेही कमी पडू नयेत या ध्येयधोरणाने सुरू करण्यात आलेल्या अनेक अभ्यासक्रमांना चांगले रूप प्राप्त झाले आहे. तसेच काही नवे अभ्यासक्रमही सुरू करण्यात आले आहेत. फेब्रुवारी, २००९ मध्ये नॅक समितीने विद्यापीठास पुनर्मूल्यांकनासाठी भेट दिली होती. त्यानुसार विद्यापीठास **'बी' (CGPA 2.85)** हे मानांकन प्राप्त झाले आहे. तसेच अकराव्या पंचवार्षिक योजनेसाठी रूपये १४.७० कोटी इतके भरघोस अनुदान विद्यापीठास प्राप्त झाले.

याही वर्षी विद्यापीठाने विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांशी व विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्याची परंपरा चालू ठेवली आहे. National Dong Hwa University, Taiwan यांच्याशी अध्यापन आणि संशोधन कार्यासाठी सामंजस्य करार झाला आहे तर tCognition या संस्थेशी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सॅप प्रणालीचे प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे.

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यापीठाची यशस्वी वाटचाल सुरू आहे. विद्यार्थी केंद्रीत दृष्टिकोन ध्यानात घेऊन अनेक उपक्रम विद्यापीठात राबविले जातात. डॉ. अप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन अंतर्गत **कमवा आणि शिका** या योजनेचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना होतो आहे. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी **मागेल त्याला काम** यासारखा अभिनव उपक्रमही कार्यान्वित करण्यात आलेला आहे. विद्यापीठ व विविध महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ प्रतिवर्षी सुमारे १८ लाखांच्या शिष्यवृत्त्या प्रदान करते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास व संशोधन केंद्रातर्फे महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने एस.सी., एस.टी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यात आले आहे. यावर्षी विविध देणगीदारांकडून रूपये १४ लाख ६१ हजार इतकी रक्कम शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झाली आहे.

गेल्या वर्षभरात विद्यापीठ परिसरात अनेक नव्या इमारतींचे बांधकाम हाती घेण्यात आले. त्यामध्ये शाहू सिनेट सभागृहाचे नूतनीकरण तसेच वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र व अनेक्स बिल्डींग या इमारतींचे विस्तारीकरण करण्यात आले. तंत्रज्ञान अधिविभागाची (Department of Technology) इमारत व वसतिगृह पूर्णत्वास येत आहे. दूरशिक्षण विभागाची भव्य इमारतही पूर्ण होत आहे. तसेच विद्यापीठाचे नवीन क्रीडासंकुलही उभे राहात आहे.

विद्यापीठात विविध अध्यासने व अभ्यास केंद्रे सक्षमपणे कार्यरत असून मला सांगायला आनंद होतो की, महाराष्ट्र शासनाने **कर्मवीर भाऊराव पाटील अध्यासन** शिवाजी विद्यापीठात स्थापन करण्याची घोषणा केलेली आहे.

नव्या काळाची गरज ओळखून गतवर्षातही नवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. Diploma in Communal Harmony, Certificate Course in Proof Reading हे अभ्यासक्रम कार्यान्वित करण्यात आले. विद्यापीठात शैक्षणिक लवचिकतेच्या धोरणानुसार सत्र पध्दती, क्रेडिट सिस्टीम तसेच अंतर्गत मूल्यमापन पध्दती सक्षमपणे सुरू आहेत. गेल्या काही वर्षात विद्यापीठ अधिविभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. एस.सी., एस.टी. विद्यार्थ्यांसाठी 'रेमिडियल कोचिंग स्कीम' अंतर्गत विशेष कोचिंगचे आयोजन केले जात आहे. गतवर्षात सेट या चाचणी परीक्षेत विविध अधिविभागातील ६६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सहा अधिविभागांना विशेष संशोधन केंद्रे सॅप (SAP) म्हणून मान्यता मिळाली आहे. त्याचप्रमाणे फिस्ट (FIST) अंतर्गत सहा व असिस्ट (ASSIST) अंतर्गत सहा अधिविभागांना खास संशोधन सहाय्य प्राप्त झाले आहे.

गतवर्षात विद्यापीठातील विविध अधिविभागात बृहत संशोधन प्रकल्प (Major Research Project) व लघुसंशोधन प्रकल्प मान्य होण्यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. यावर्षी १७ मेजर रिसर्च प्रोजेक्टस् व एक मायनर रिसर्च प्रोजेक्ट प्राप्त झाले आहेत. नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्टस, नवी दिल्ली या भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने बॅ. खर्डेकर ग्रंथालयातील दुर्मिळ अशा हस्तलिखितांच्या संरक्षणासाठी Manuscript

Resource Centre स्थापन करण्यात येणार असून त्यासाठी रूपये २५ लाख अनुदान मिळाले आहे.

विद्यापीठ संशोधन व विस्तार कार्यासाठी वर्षभरात विविध संस्थांकडून भरघोस अनुदान प्राप्त झाले आहे. मला सांगायला आनंद होतो की, गेल्या काही वर्षात विद्यापीठास मिळणाऱ्या संशोधनपर अनुदानात मोठी वाढ झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग व इतर वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्पांतर्गत गतवर्षी सुमारे रूपये १९ कोटी ४० लाख इतके अनुदान मंजूर झाले आहे.

विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयात गतवर्षात विविध चर्चासत्रांचे, कार्यशाळांचे व व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने **भटक्या व विमुक्त जमाती यांचे प्रश्न** या विषयावर दिनांक १५ व १६ जानेवारी, २०१० रोजी चर्चासत्र संपन्न झाले. तसेच रसायनशास्त्र अधिविभागाच्या वतीने दिनांक २३ व २४ डिसेंबर, २००९ रोजी Advanced Synthetic Methodologies and Functional Materials या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. अर्थशास्त्र विभागाने दिनांक ११ व १२ फेब्रुवारी, २०१० रोजी **सहकाराचे पुनरूज्जीवन** या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र घेतले.

विद्यापीठात 'प्लेसमेंट सेल' या विभागाचा विद्यार्थ्यांना मोठा उपयोग होतो आहे. गतवर्षात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधी प्राप्त व्हाव्यात म्हणून प्लेसमेंट सेलच्या वतीने विविध कॅम्पस इंटरव्हयूंचे आयोजन करण्यात आले. या सेलच्या वतीने इन्फोसिस बीपीओ लि., पुणे येथे Industry Academia Partnership (IAP) Train the Trainer (TTT) या कार्यक्रमाअंतर्गत ४८ प्राध्यापकांनी बीपीओचे प्रशिक्षण घेतले तसेच अंतिम

वर्षात शिकत असलेल्या २५ विद्यार्थ्यांची इंटर्नशिप प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली. पर्यावरणशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांची पुण्याच्या टेक्नोग्रीन कंपनीत निवड झाली.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य सक्रीयपणे चालू आहे. या योजनेअंतर्गत विविध श्रमसंस्कार शिबिरांचे आयोजन करण्यात आले. तसेच दिनांक १ ते ३ फेब्रुवारी २०१० रोजी बहाई अकादमी पाचगणी येथे शिलेदार शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने इंद्रधनुष्य २००९ या राज्यस्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवामध्ये राज्यातील ६२८ विद्यार्थी सहभागी झाले. या वर्षी तीन विभागीय युवा महोत्सव तसेच सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, रहिमतपूर येथे मध्यवर्ती युवा महोत्सव संपन्न झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी विविध स्पर्धांमधून नेत्रदीपक असे यश संपादन केले आहे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धामधून विद्यापीठाचे खेळाडू चमकले आहेत. कु. राही सरनोबत व कु. स्नेहांकिता वरूटे या आमच्या विद्यार्थीनींनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेतला. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत पुरुष संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच इतर विभागीय व आंतर विद्यापीठ स्पर्धातून वैयक्तिक व सांघिक यश विद्यापीठ खेळाडूंनी प्राप्त केले. अश्वमेध स्पर्धेमध्ये विद्यापीठास तिसरा क्रमांक मिळाला आणि एकूण ७ सुवर्ण, ६ रौप्य व ९ कांस्य अशी २२ पदके मिळाली.

विद्यापीठाने कार्यान्वित केलेल्या दूरशिक्षण केंद्रास उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या केंद्राच्या वतीने २० अभ्यास केंद्रे विविध ठिकाणी कार्यान्वित करण्यात आली आहेत. दूर शिक्षण केंद्राच्या वतीने स्वयंअध्ययन

पुस्तिकांच्या (SIM) निर्मितीत मोठी वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे सांगली व सातारा येथे दूरशिक्षणासाठी विभागीय केंद्रे स्थापन करीत आहोत. त्याद्वारे आधुनिक संज्ञापन माध्यमांच्या सहाय्याने शिक्षण देण्यात येईल.

विद्यापीठाच्या प्रशासनात मोठी सक्षमता आणलेली आहे. त्यास अधिक गतिमानता आणण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. परीक्षा अर्ज, निकाल व विविध परिपत्रके विद्यापीठ वेबसाईटवरून प्रसिद्ध करीत आहोत. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त गुणवंत शिक्षक व गुणवंत कर्मचारी व यश संपादन केलेल्या पाल्यांना गौरविण्यात आले. मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने Colleges with Potential for Excellence या अंतर्गत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा, यशवंतराव चव्हाण इन्स्टि. ऑफ सायन्स, सातारा व कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली या चार महाविद्यालयांची निवड झाली आहे. अग्रणी महाविद्यालय (Lead College) अंतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत.

याही वर्षी विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करण्याची आपली परंपरा अबाधित राहिली आहे. ऑक्टोबर, २००९ मध्ये घेतलेल्या २६० परीक्षांपैकी २३६ परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत जाहीर करण्यात आले.

शाहू संशोधन केंद्राच्या वतीने डॉ. अप्पासाहेब पवार यांनी संकलित केलेल्या मोडी लिपीतील सुमारे २००० दुर्मिळ पत्रांची सूची प्रसिद्ध करण्याचे काम सुरू आहे.

मित्रहो, आतापर्यन्त आपण गतवर्षातील वाटचालीचा आढावा घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने स्थापन झालेल्या या विद्यापीठाच्या

कुलगुरू पदाची धुरा मी नुकतीच स्वीकारली आहे. डॉ. अप्पासाहेब पवार व त्यानंतरच्या सर्वच कुलगुरूंनी या विद्यापीठाच्या लौकिकात मोठीच भर घातली आहे. विद्यापीठास अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचे व त्यास सर्वसामान्य जनतेपर्यन्त नेण्याचे त्यांचे जे ध्येय होते ते पूर्ण करण्याचे माझे प्रयत्न राहतील.

यासाठी पुढील काही योजना माझ्या नजरेसमोर आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठात **नॅशनल इन्स्टि. ऑफ रूरल मॅनेजमेंट** अशी संस्था स्थापन करण्याचा माझा निर्धार आहे. त्याचप्रमाणे नव्या काळास व परिस्थितीस अनुसरून अनेक नवे अभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्प हाती घेण्याचा माझा मानस आहे. या कार्यक्षेत्रातील पर्यावरणाचा विचार करून राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत Watershed Development Programme हा उपक्रम राबविण्याचा माझा विचार आहे. तसेच तरुण प्राध्यापक व पीएच.डी. मार्गदर्शकांना संशोधन व अध्यापन कार्याचे प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल. महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येईल. कारण आज आपल्या दृष्टिकोनात संपूर्ण बदल घडवून आणण्याची गरज आहे. नवी कौशल्ये, नवे ज्ञान व ती मिळविण्याची साधने प्राप्त करणे ही काळाची गरज आहे. आपल्यातील गुणांचे संवर्धन करणे व आपल्या मर्यादा दूर करणे हे आजच्या काळाशी सुसंगत ठरेल. यातूनच आपणांस नवा आत्मविश्वास व बळ प्राप्त होईल. आपण सातत्याने अध्ययन, अध्यापन व संशोधन क्षेत्रात प्रत्येक गोष्ट उत्तम प्रकारे करण्याचा ध्यास घेतला पाहिजे. त्यासाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास, संगणक कौशल्य व इंग्रजी संभाषण कौशल्य तरूणांना दिले पाहिजे. येत्या पाच वर्षात शिवाजी विद्यापीठास या कार्यक्रमाच्या द्वारा जागतिकीकरणाच्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यास सज्ज करण्याचा माझा संकल्प आहे. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

आजच्या समारंभाचे प्रमुख पाहुणे नामवंत अर्थतज्ज्ञ मा. डॉ. नरेंद्र जाधव यांचा परिचय आपणांस आहेच. अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. सध्या ते केंद्रीय नियोजन आयोगाचे सन्माननीय सदस्य असून शिक्षण या विषयाचा कार्यभार त्यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. तत्पूर्वी ते पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. तसेच त्यांनी रिझर्व्ह बँकेत प्रमुख सल्लागार आणि अर्थतज्ज्ञ म्हणून मौलिक स्वरुपाचे कार्य केले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्याचप्रमाणे अफगाणिस्तान आणि इथिओपिया या देशामध्ये त्यांनी सल्लागार म्हणून काम केले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे शोधण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते. आतापर्यन्त त्यांची ११ पुस्तके व १०० संशोधनपर लेख प्रसिध्द झाले आहेत. 'आमचा बाप आन् आम्ही' हे त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले. जगातील १७ भाषांतून त्याचे अनुवाद झाले आहेत. तसेच त्यांना आजवर २५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्यासारखे मान्यवर पाहुणे आपणांस लाभले हे आपले अहोभाग्य आहे.

मित्रहो, पुन्हा एकदा आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करून मी माझे अहवाल वाचन पूर्ण करतो आणि आजच्या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. नरेंद्र जाधव यांना विनंती करतो की, त्यांनी आपले दीक्षान्त भाषण करावे.

■ ■ ■

प्रकाशक : प्र. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.
मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४